# विभागीय कार्यालय, नाशिक – मातोश्री वसतिगृह

- **उद्देश :** महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडीलशा.नि.क्र. वसति५३१७/प्र.क्र.९/मशि- २ दि. १८/१०/२०२२ अन्वये नाशिक येथीलआर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील मुलींसाठीचे वसतिगृह सारथी महाज्योती यासंस्थामार्फत सुरु करण्यास मान्यता प्राप्तझालेली आहे. सदरवसतिगृहात सारथी संस्थेच्या मराठा. कुणबी, मराठा- कुणबी व कुणबी मराठालक्षित गटातील ७५ मुलींसाठी महाज्योती संस्थेच्या इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमातीव विशेष मागासप्रवर्ग गटातील ७५ मुलीसाठी आणि उच्च व तंत्र शिक्षण विभागा मार्फतआर्थिकदृष्ट्यादुर्बल घटकातील ५० मुलीसाठी अशाप्रकारे लक्षित घटकातील एकुण २०० मुलींसाठीवसतिगृहात प्रवेश क्षमता निश्चित करणेत आली आहे.
- **वसतिगृह इमारत ताबा :** उच्च व तंत्र शिक्षण विभाग, नाशिक तथा प्र. अधिक्षक, मातोश्री मुलीचेवसतिगृह, नाशिक यांनी त्याचे पत्र क्र. माम्यनाशिक / लेखा/२०२४/१० दि. १८/०३/२०२४ च्या नुसारसदर वसतिगृह इमारत ताबा सारथी, नाशिक यांनी दि. २१/०३/२०२४ रोजी घेण्यात आला आहे.
- **वसतिगृह चालविणेसाठी आवश्यक कर्मचारी वर्ग :** मातोश्री वसतिगृह व्यवस्थापनासाठी कंत्राटीतत्वावरील बाह्य यंत्रणेद्वारे ०२ गृहपाल पूर्णवेळ, ०२ कनिष्ठ लिपीक संगणक सहाय्यक/स्टोअरकिपर, ०२ शिपाई, ०४ सफाई कामगार, तसेच प्रशिक्षीत माजी सैनिक संवर्गातून MESCO मार्फत ०३ पुरुष कर्मचारी व ०३ स्त्री कर्मचारी यांची नेमणूक करणेत आली आहे.
- तसेच श्रीमती मंगल येलमामे, समाज कल्याण विभागाकडील नियमीत गृहपाल यांचेकडे मातोश्रीवसतिगृह येथील प्रभारी गृहपाल पदाचा अतिरीक्त कार्यभार सोपिविणेत आलेला आहे.
- **प्रवेश :** मागील शैक्षणिक वर्षात अर्ज केलेल्या विदयार्थिनींना दि. १५/०७/२०२४ पासून प्रत्यक्ष प्रवेशदेणेत आलेला आहे. सदयस्थितीत खालील नमूद प्रमाणे विदयार्थिनी वसतिगृहात रहात आहेत.

| अ. क्र. | तपशिल | एकूण जागा | भरलेल्या जागा | रिक्त जागा |
|---|---|---|---|---|
| ०१ | सारथी | ७५ | ७५ | ० |
| ०२ | महाज्योती | ७५ | ६७ | ०८ |
| ०३ | उच्च व तंत्र शिक्षण | ५० | ४२ | ८ |
| | **एकूण** | **२००** | **१८४** | **१६** |

- **निर्वाह भत्ता :** उच्च व तंत्र शिक्षण विभाग शा.नि.क्र. पनियो-२०२२/प्र.क्र.१८६/तांशि-४दि.०५/०१/२०२४अन्वये विदयार्थिनींना आवश्यक भोजन व निर्वाह भत्ता प्रतिवर्ष रु. ३६,०००/- ईतकेमंजूर झाले असून विदयार्थिनींच्या प्राप्त हजेरीनूसार दरमहा रु. ३,६००/- (शैक्षणिक वर्षात १०महिन्यांकरीता) प्रमाणे विदयार्थिनींच्या थेट बॅक खात्यावर DBTव्दारे अदा करणेत येत आहे.
- **सुरक्षा संबंधी उपाययोजना :** उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचेकडील शा.नि.दि. २८/०६/२०२३ अन्वये तसेच वेळोवळी पारीत केलेल्या निर्णयांप्रमाणे विदयार्थिनींच्या सुरक्षीततेची खबरदारी म्हणूनवसतिगृहात CCTV यंत्रणा (१६ कॅमेरे, Biometrics Face Reading Machine, MESCO याएजन्सीमार्फत माजी सैनिक संवर्गातून प्रशिक्षीत

सुरक्षारक्षक नेमलेले असून सुरक्षा समिती गठीतकरणेत आली आहे. तसेच वसतिगृहातील बाहेरील परिसर देखील CCTV निगराणी खाली येणेसाठीवाढिव CCTV तसेच अलार्म सिस्टीम लावणेकरीता कार्यवाही चालू आहे.

- **सोयीसुविधा :** विदयार्थिनींना आंघोळीसाठी गरम पाणी मिळणेसाठी सोलर सिस्टीम कार्यान्वीत करणेत आली आहे. पिण्याच्या पाण्यासाठी ०३ वॉटर कूलर व ०३ वॉटर फिल्टर बसविणेत आलेले आहे. ग्रंथालयात छोटया प्रमाणात पुस्तके उपलब्ध करुन देणेत आली असून त्यात वाढ करण्यात येतआहे. लाईट गेल्यास अश्या वेळी डिझेल जनरेटर देखील बसविणेत आलेले असून ते कार्यान्वीतकेलेले आहे. विदयार्थिनींना प्रत्येक रुमसाठी ०२ बादल्या, मग, डस्टबीन, stool, पडदे या बाबी पुरविणेत आल्या आहेत. वसतिगृह पूर्णक्षमतेने सुरु झालेनंतर पाण्याची कमतरता भासून नये व बोअर ऐवजी कार्पोरेशनचे स्वच्छ पाणी मिळावे या बाबी विचारात घेता दिड इंच पाईपलाईनचे दोन कनेक्शन घेणेत आलेले आहेत. तळ मजल्यावरील २ व सिंटेक्सच्या ६ टाक्या या साफ करुन घेणेत आलेल्या आहेत. विदयार्थिनी ये-जा नोंद दृष्टिकोणातून biometrics machine बसविणेत आले आहे. जिल्हा ग्रंथालय अधिकारी यांचे कार्यालयाकडून आवश्यक पुस्तक लायब्ररिसाठी उपलब्ध करुन देणेत आले आहे. दि. १९/०१/२०२५ रोजी जिल्हा सामान्य रुग्णालय, नाशिक येथील वैदयकिय अधिकारी पथकाच्या मदतीने विदयार्थिनींसाठी आरोग्य तपासणी शिबीर आयोजीत करणेत आले.
- जिम साहित्य, ग्रीन जिम, क्रिडांगण, संगणक संच, स्पर्धा परिक्षा पुस्तक, दूरदर्शन संच या बाबींचीदेखील पूर्तता करणेसाठी पाठपुरावा चालू आहे. **जिल्हा वार्षिक (सर्वसाधारण) योजना सन २०२४-२५ अंतर्गत लेखाशिर्ष २२०४४७८२ – व्यायामशाळांचा विकास योजनेमूधन मातोश्री मुलींचे वसतिगृह, नाशिक येथे खुले मैदानातील व्यायाम साहित्य हे काम रु. ५.०० लक्ष मर्यादेत पाठपुरावा करुन मंजूर करुन घेणेत आले.**